# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.06.2025** **वार:शुक्रवार**

1. समृद्धी महामार्गाच्या अखेरच्या टप्प्याचं उद्घाटन; हा महामार्ग आर्थिक समृद्धीचा कॉरिडॉर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
2. जागतिक पर्यावरण दिन राज्यात विविध उपक्रमांद्वारे साजरा
3. रायगडासह विविध गड किल्ल्यांवर आज शिवराज्याभिषेक सोहळ्याचा उत्साह आणि
4. राज्यात आदिशक्ती अभियान राबवण्यासाठी येत्या 15 दिवसांत ग्रामसमित्या स्थापन करण्याचे निर्देश

**समृद्धी महामार्ग**

समृद्धी महामार्ग हा केवळ रस्ता नाही तर तो महाराष्ट्राच्या आर्थिक समृद्धीचा कॉरिडॉर आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या 75 किलोमीटरच्या अखेरच्या टप्प्याचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल इगतपुरी इथं झालं. त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले.....

**समृद्धी महामार्ग हा केवळ एक रस्ता नाहीये. हा महाराष्ट्राच्या समृद्धीचा इकॉनॉमिक कॉरिडॉर आहे. आणि म्हणूनच याला हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग अशा प्रकारचं नामकरण हे आपण दिलेलं आहे कारण या महामार्गाने महाराष्ट्राचं इंटिग्रेशन साधलेलं आहे. जवळपास महाराष्ट्राचे चोवीस जिल्हे या महामार्गामुळे जेएनपीटी पोर्टशी कनेक्टेड आहेत आणि लवकरच हा महामार्ग नवीन वाढवण बंदराशी देखील आम्ही कनेक्ट करणार आहोत त्यामुळे पोर्ट लेट डेव्हलपमेंट ही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचं काम या महामार्गाच्या माध्यमातून होणार आहे.**

समृद्धी महामार्गाच्या या टप्प्यामुळे नागपूर ते मुंबई हा प्रवास फक्त आठ तासांत करता येणार आहे. नाशिक आणि ठाणे जिल्ह्यांमधून जाणारा या शेवटच्या टप्पा सह्याद्रीच्या पर्वतरागांमधून बोगदे आणि पुलांद्वारे पूर्ण केला आहे. यात 11 किलोमीटर लांबीचे 5 बोगदे असून इगतपुरीतला 17 मीटरपेक्षा जास्त रुंद आणि 9 मीटरपेक्षा जास्त उंचीचा बोगदा राज्यातला सर्वात लांब आणि रुंद बोगदा आहे. या बोगद्यात बसवलेल्या 'जनरेशन व्हेइकल एक्सिट सिस्टम'चा वापर भारतात पहिल्यांदाच करण्यात आला आहे.

**पर्यावरण दिन**

जागतिक पर्यावरण दिन काल देशभर मोठ्या उत्साहानं आणि विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. 'प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदूषणावर मात' ही यंदाच्या पर्यावरण दिनाची मुख्य संकल्पना होती. एकल प्लास्टिकचा वापर टाळून कापडी पिशव्या वापरण्याच आवाहन राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी काल मुंबईत मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात केलं. मंत्रालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनीही एकल प्लास्टिकचा वापर टाळण्याचा संकल्प केला. पर्यावरण दिनानिमित्त काल राज्यात झालेल्या विविध उपक्रमांबाबत हा वृत्तांत....

**अंधाराचा पान्हा चुंबत खोलवर जाणारी आणि प्रकाशाची कास धरत गगनाला गवसणी घालू पाहणारी झाडं म्हणजे काळोख आणि प्रकाशाला जोडणारे खरेखुरे पूल ! कालच्या जागतिक पर्यावरणदिनी देशभर या वृक्षराजीच्या जतन**

**संवर्धनासाठीची कटिबद्धता व्यक्त केली गेली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत विशेष वृक्षारोपण मोहीमेचा प्रारंभ करताना वाटवृक्षारोपण केलं तर आपल्या निवासस्थानी कच्छ आणि गुजरातमधल्या वीरमाता आणि भगिनींनी दिलेली शेंदराची रोपं लावली. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नवी दिल्लीत 'एक पेड माँ के नाम' मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी वृक्षारोपण केलं. अहिल्यानगर जिल्ह्यातल्या हिवरेबाजारमधल्या मातृस्मृती वनमंदिरात एकूण 1 हजार 400 वृक्षांची लागवड करण्यात आली. केंद्रीय संचार ब्युरोच्या महाराष्ट्र आणि गोवा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांनी संपूर्ण महाराष्ट्र आणि गोवा राज्यांमध्ये विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं होतं. सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच अमरावतीमध्ये प्लास्टिक बंदी आणि वृक्षारोपण या विषयावर रांगोळी, छायाचित्रण आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. नागपूरच्या झिरो माईल मेट्रो स्टेशनवर, वर्धा इथं प्लास्टिक बंदी या विषयावर चित्रकला, निबंध स्पर्धा झाल्या. छत्रपती संभाजीनगर इथं सायकल रॅलीचे उद्घाटन माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांनी केलं. जळगाव, नांदेड, नाशिकमध्ये रॅली, प्रतिज्ञा आणि वृक्षारोपण मोहीम पार पडली. सोलापूर 'महानगरपालिकेच्या समन्वयानं सेल्फी बूथ, वृक्षारोपण, प्रतिज्ञा आणि सायकल रॅली असे विविध उपक्रम आयोजित केले गेले. पुण्यात शिवसेनेच्या वतीने 'पर्यावरण जनजागृती दिंडी'चं आयोजन करण्यात आलं होतं. 'एक झाड एक आशा' म्हणत संस्था संघटनांनी वृक्षारोपणही केलं. खरोखरीच निसर्गाविना वैराण होणाऱ्या भविष्याची वृक्षवल्ली हीच तर आशा आहे एकमेव..! आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून डॉक्टर स्वाती महाळंक.**

## शिवराज्याभिषेक

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या रायगडासह राज्यातल्या विविध गड किल्ल्यांवर आज शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रम होणार आहेत. यासाठी हजारो शिवभक्त रायगड आणि अन्य गडांवर दाखल होत आहेत. पुण्यातही अखिल भारतीय शिव महोत्सव समिती, मराठा सेवा संघ आणि इतर शिवप्रेमी संघटनांच्या वतीने लाल महालात शिवराज्याभिषेक सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे.

## अकरावर्ष-सांस्कृतिक वारसा

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळे भारतामध्ये गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन घडून आलं आहे. आकाशवाणीच्या बातम्यांमधून आम्ही; गेल्या 11 वर्षात केंद्र सरकारनं काही प्रमुख क्षेत्रांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीवर प्रकाश टाकत आहोत, या मालिकेतील आजचा विषय आहे; सांस्कृतिक वारशाचं जतन संवर्धन करण्यासाठी केंद्र सरकारनं राबवलेले उपक्रम; ऐकुया एक वृत्तांत.....

**गेल्या दशकात भारताची विविधरंगी संस्कृती आणि वारसा अधोरेखित करणाऱ्या अनेक स्थळांना नवी ऊर्जा मिळाली आहे. हंपीच्या मंदिरापासून ते शास्त्रीय संगीत आणि नृत्याच्या परंपरांपर्यंत अनेक मूर्त आणि अमूर्त वारशांना नवी झळाळी मिळते आहे. अयोध्येतील राम मंदिराची उभारणी, वाराणसीतील काशी विश्वनाथ धाम कॉरिडॉर, उज्जैनमधील महाकाल लोक प्रकल्प, केदारनाथ आणि बद्रीनाथ धाममध्ये उभारलेल्या पायाभूत सुविधा यामुळे भारताच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा, जतन होत असतानाच देशांतर्गत पर्यटनातही लक्षणीय वाढ होत आहे. शीख गुरुद्वारा, बौद्ध विहार, जैन मंदिर, सूफी दर्गे आणि आदिवासींची पवित्र स्थळ यांचंही पुनरुज्जीवन करण्याचं काम सध्या सुरू आहे. आपला सांस्कृतिक वारसा अधोरेखित करणाऱ्या तीनशे पन्नासहून अधिक मूर्ती आणि कलाकृती विविध देशांमधून सरकारनं पुन्हा भारतात आणल्या आहेत. वारसा जतन करण्याच्या अनुषंगानं देशाच्या विविध भागातील शहात्तर प्रकल्पांसाठी पाच हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची तर तरतूद करण्यात आली आहे मूर्तिशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉक्टर गो.बं देगलूरकर यांनी सरकारच्या या प्रयत्नांबद्दल समाधान व्यक्त केलं आहे...**

**रामजन्मभूमीवर रामाचं मोठं मंदिर उभारण्याकरता मदत केली प्रोत्साहन दिलं माझं भाग्य असं की ती राममूर्ती कशी असावी याच्याबद्दल चर्चा झाली त्यात पहिल्यांदाच माझा समावेश झालेला होता भारतातील अनेक वारसास्थळ कशी सुरक्षित होतील हा त्यांना नवनिर्माण करणं कसं शक्य आहे त्याच्याबद्दलचं प्रोत्साहन नरेंद्र रेड्डी देत आहेत भारतीयांना त्याच्यामुळे भारतीयांच्या पुनरुत्थानाला एक मोठं वलय प्राप्त झालं असं मला वाटतं.**

**देशाचा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीनं सुरू असलेल्या या उपक्रमांमुळे येणाऱ्या अनेक पिढ्यांमध्येही एकतेच्या मूल्याची रुजवात होणार आहे आकाशवाणी बातम्यांसाठी माधवी कुलकर्णी पुणे.**

**कृषिसंकल्प-नंदुरबार**

देशभरात सुरू असलेल्या विकसित कृषी संकल्प अभियाना अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यातील अडगाव या आदिवासी गावात काल शेतकरी मेळावा घेण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांना शास्त्रोक्त जैविक शेती, कृषी आणि कृषिपूरक उद्योगात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याबाबत मार्गदर्शन करण्यात आलं. याविषयी बोलताना नंदुरबार कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. राजेंद्र दहातोंडे म्हणाले.....

**शास्त्रज्ञांच्या वेगवेगळ्या टीम यामध्ये आयसीआर च शास्त्रज्ञ आहेत आत्मा कृषी विभाग कृषी विज्ञान केंद्र यांच्या विविध टीम केलेल्या आहेत आणि विविध गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना माहिती तंत्रज्ञान योजना याविषयी माहिती दिली जाते शासकीय योजना असतील त्याविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली जाते प्रत्यक्ष घेतलेल्या माहितीचा तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये वाढवावा आणि येणाऱ्या खरीप हंगामामध्ये अशा पद्धतीच्या घेतलेल्या तंत्रज्ञानाच्या माहितीचा उपयोग करून आपले उत्पन्न वाढावे यासाठी विकसित कृषी संकल्प अभियान नंदुरबार जिल्ह्यामध्ये सुरु आहे**

**समित्या**

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आदिशक्ती अभियान राबवता यावं याकरता येत्या 15 दिवसांत ग्रामसमित्या स्थापन करण्याचे निर्देश महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी काल मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले. या अभियानाअंतर्गत विविध विभागांमधल्या महिलांच्या समस्या सोडवणं, हुंडा प्रथा थांबवणं, महिलांशी निगडित विविध योजनांबद्दल जनजागृती करणं असा व्यापक उपक्रम राबवला जाणार आहे.

**शेखावत**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पर्यटकांना शनिवारवाड्याचा भव्यदिव्य अनुभव देण्यासाठी पुरातत्व विभाग प्रयत्नशील आहे, असं प्रतिपादन केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी काल पुण्यात केलं. ऐतिहासिक वारसास्थळ असलेल्या शनिवारवाड्याला भेट देऊन त्यांनी पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यावेळी उपस्थित होत्या.

**हवामान**

राज्यात तुरळक ठिकाणी वादळी वारे, आणि विजांसह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. शेतकऱ्यांनी सतर्क राहावं, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.